MHAH180000532017

## .नियमित दावा क्रमांक २३ सन २०१७ नि ७ खालील आदेश
**सीनआर क्रमांक MHAH18000053 2017**

श्री आसाराम मारुती भुसारी ..वादी
विरुध्द

१.श्री रामदास दगडु चौधरी
२.श्री दगडु धोंडिराम चौधरी
३.श्री कारभारी धोंडिराम चौधरी
४.श्रीमती अरुणा साहेबराव नवले
५.श्रीमती कुसूम दत्तू नवले
६.श्रीमती कल्पना विष्णु कदम . .प्रतिवादी

....

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश २६ नियम ९ अन्वये कोर्ट कमिशनर -उपअधिक्षक, तालुका भूमि अभिलेख निरीक्षक, राहुरी यांची नेमणुक होवून त्यांचे मार्फत दावा कलम १ मध्ये दर्शविलेल्या मिळकती मौजे कुक्कडवेढे ता राहुरी येथील गट क्रमांक २२९/१ व गट क्रमांक २२९/२ च्या बांध हद्दी निश्चिीत व मोजणी करुन तसा मोजणी अहवाल दाखल करणेसाठी केला आहे.

**वादीचा प्रस्तुतचा अर्ज थोडक्यात खालीलप्रमाणे** -

**२.** वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीं विरुध्द दावा मिळकतीची मोजणी होवुन, बांध हद्दी निश्चित होवून व निरंतर ताकीद मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे.

**३.** दावा कलम १ मधील मौज कुक्कडवेढे, ता राहुरी येथील गट क्रमांक २२९/१ पैकी पश्चिमेकडील ०-३० आर क्षेत्र वादीचे खरेदी मालकीचे असून दावा मिळकत गट क्रमांक २२९/२ पैकी उत्तरेकडील १ हे.२० आर क्षेत्र वादीस महाराष्ट्र शासनाकडून पुनवर्सेन म्हणून मिळालेली मिळकत आहे.

**४.** वादीचे दावा मिळकत गट क्रमांक २२९/१ पैकी ०-३० आर क्षेत्राचे पूर्वेस मायनर चारी व प्रतिवादी क्रमांक १ व २ चे क्षेत्र असून काही क्षेत्र उत्तरेस आहे. गट क्रमांक २२९/१ चे दक्षिणेस वादीची दावा मिळकत गट क्रमांक २२९/२ पैकी १

हेक्टर २० आर क्षेत्र असून त्याचे दक्षिणेस प्रतिवादी क्रमांक ४ ते ६ यांचे गट क्रमांक २२९/२ पैकी राहिलेले ०-८० आर क्षेत्र आहे. गट क्रमांक २२९/२ चे दक्षिणेस प्रतिवादी क्रमांक ३ ची मिळकत गट क्रमांक २२९/३ ही मिळकत आहे. वादी व प्रतिवादी यांच्या मिळकती या त्रिकोणी पिरॅमिड प्रमाणे असून पूर्वेस तिरपा रस्ता असून पश्चिमेस तिरपा सडे शिव रस्ता आहे. वादी व प्रतिवादी यांच्या मिळकती व क्षेत्र पुर्व पश्चिम असून त्यांना वहिवाटीसाठी पूर्वेकडून व पश्चिमेकडून रस्ता आहे.

५. प्रतिवादी क्रमांक ३ यास त्याचे गट क्रमांक २२९/३ मध्ये जाणेसाठी पूर्वेकडून, पश्चिमेकडून व मिळकतीतील मायनर चारीचे पुर्वेकडून दक्षिणोत्तर बैलगाडी रस्ता तसेच पश्चिमेकडून सडे शिवरस्ता अस्तित्वात असतांना प्रतिवादी क्रमांक ३ हा वादीचे दावा मिळकत गट क्रमांक २२९/१ पैकी ०-३० आर क्षेत्रामधुन पश्चिमेकडील तसेच गट क्रमांक २२९/२ मधील १ हे. २० आर क्षेत्रातून चारीच्या पश्चिमेकडील क्षेत्रामधुन सडे शिव रस्ता लगततुन उत्तरेकडून दक्षिणेकडे नविन रस्ता निर्माण करु पाहत आहे. त्याकामी प्रतिवादी क्रमांक ३ ने राहुरी पोलीस व महसुल अधिकारी यांना हाताशी धरले आहे. त्याने रे.मु.नं ६२०/२०१६ चा दावा दाखल करुन परस्पर विसंगत कथने केलेली असून वेगवेगळया मागण्या केल्या आहे. राहुरी पोलीस व मंडलाधिकारी यांना हाताशी धरुन दुसराच नविन रस्ता निर्माण करावयाचा प्रयत्न चालू केला आहे.

६. तसेच प्रतिवादी क्रमांक १ ते ६ यांनी वादीचे मिळकती दरम्यानचे समाईक बांधाची मोडतोड करुन दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करीत आहे. वादीचे दावा मिळकतीचे क्षेत्र ७/१२ प्रमाणे भरत नाही. म्हणून वादीची विनंती की दावा मिळकतीची कोर्ट कमिशनर म्हणून तालुका भूमि अभिलेख निरीक्षक, राहुरी मार्फत मोजणी करुन वादीच्या बांधाच्या क्षेत्राच्या हद्दी ठरवून खूणा कायम करुन दयाव्यात म्हणून सदरचा अर्ज दाखल केलेला आहे

७. प्रतिवादी क्रमांक १ ते ३ चे विधीज्ञ श्री एच.एन मोरे यांनी सदरचा अर्ज व रे.मु.नं ६२०/२०१६ मधील नि ७ चा अर्ज बाबत एकत्रित आदेश करुन रे.मु. नं २३/२०१७ व रे.मु.नं ६२०/२०१६ मधील वादीनी ५० टकके फी भरण्याबाबत आदेश करावा असे म्हणणे दिलेले आहे.

८. प्रतिवादी क्रमांक ४ ते ६ चे विधीज्ञ श्री. बी.एस. नवले यांनी त्यांच्या कैफयतीत असे कथन केलेले आहे की, प्रतिवादी क्र. १,२ व ३ ते ६ हे वादीचे दावा मिळकती दरम्यानचे सामाईक बांधाची मोडतोड करुन दावा मिळकतीमधील अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करित आहेत. तसेच वादीचे दावा मिळकतीचे क्षेत्र सातबारा प्रमाणे भरत नाही हे कथन चुकीचे आहे. तसेच पुढे त्यांनी असे कथन केलेले आहे की, प्रतिवादींनी कधीही लगतचे सामाईक बांधाची मोडतोड केली नाही, वादींचे जमीनीत अतिक्रमण केलेले नाही व अतिक्रमण करण्याचे कारण देखील निर्माण होत नाही.

९. वादी व प्रतिवादी क्रमांक १ ते ६ यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला

१०. वादीचा अर्ज व संचिकेचे अवलोकन केले असता, नि ३ /१ मध्ये वादीने दाखल केलेल्या सात बाराच्या उता-यावरुन वादीचे नाव दिसून येते.

११. प्रस्तुतचा दावा हा बांध हद्दी निश्चित होण्यासाठी व निरंतर ताकीद मनाई हुकूम मिळणेसाठी केलेला आहे. वादातील निश्चित मुद्दयांचा गुण दोषावर निकाल करण्यासाठी निरीक्षक, तालुका भूमि अभिलेख, राहुरी यांना कोर्ट कमिशनर म्हणून प्रतिवादींनी वादींच्या दावा मिळकतीमध्ये किती अतिक्रमण केलेले आहे ते क्षेत्र दर्शविण्यासाठी व बांध हद्दी निश्चितीसाठी नेमणुक करणे गरजेचे आहे. त्यामुळे, मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | .वादीचा अर्ज (नि ७)मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | . निरीक्षक, तालुका भूमि अभिलेख राहुरी यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात येते. तसेच त्यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी दावा कलम १ मधील नमूद केलेली दावा मिळकत- गट क्रमांक २२९/१ व २२९/२ ची मोजणी तेथील सभोवतालची परिस्थिती,विभागणी रेकॉर्ड विचारात घेवून त्यांच्या हद्दी निश्चित करुन, अतिक्रमण केलेले क्षेत्र वेगळे दाखवून तसा अहवाल व नकाशा आदेश पारित केल्याच्या तारखेपासून तीन महिन्याच्या आत या न्यायालयाकडे दाखल करावा . |
| ३. | . वादीने कोर्ट कमिशनरची ५० टक्के फी व प्रतिवादी यांनी कोर्ट कमिशनरची ५० टक्के फी तालुका भूमि अभिलेख निरीक्षक, राहुरी कार्यालयात एक आठवडयाच्या आत तालुका भूमि अभिलेख निरीक्षक, राहुरी यांचे कार्यालयात भरावी. |

| | |
|---|---|
| ४. | .वादीने कोर्ट कमिशनरची ५० टक्के फी व प्रतिवादी क्रमांक १ ते ६ यांनी कोर्ट कमिशनरची ५० टक्के फी तालुका भूमि अभिलेख निरीक्षक, राहुरी कार्यालयात भरल्यानंतर त्याबाबतची पावती न्यायालयात दाखल केल्यानंतर कोर्ट कमिशन रिट पाठविणेत यावी. |

| | |
|---|---|
| .दिनांक : २३.०३.२०२१.<br>राहुरी | (माया.पो.मथुरे)<br>२रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर<br>राहुरी |